# मानसिक दृष्ट्या अक्षम व्यक्तीबाबतचा अ.पा.क. शेरा कमी करणे

शासनाच्या नवीन सुचनेन्वये शारीरिक/मानसिक दृष्ट्या अक्षम व्यक्तीला अपंग किंवा विकलांग न म्हणता दिव्यांग संबोधण्याच्या सूचना आहेत.

काही ठिकाणी मानसिक दृष्ट्या अक्षम असलेल्या अज्ञान व्यक्तीचे नाव वारसा हक्काने/खरेदीने महसूल गाव दप्तरात दाखल केले जाते. अर्थातच अशी व्यक्ती अज्ञान (वय १८ वर्षापेक्षा कमी) असल्यामुळे तिच्या अज्ञान पालन कर्ता (अ.पा.क.) चे नावही महसूल दप्तरात दाखल केले जाते.

कालांतराने अशी मानसिक दृष्ट्या अक्षम व्यक्ती सज्ञान (वय १८ वर्षापेक्षा जास्त) झाल्यावर अ.पा.क. चे नाव कमी करण्याबाबत अर्ज केला जातो. सर्वसाधारण अज्ञान व्यक्तीच्याबाबत अ.पा.क. चे नाव कमी करण्यास अडचण येत नाही परंतु 'दिव्यांग व्यक्तींचे अधिकार अधिनियम २०१६' अन्वये परिभाषित 'दिव्यांग व्यक्ती' किंवा 'मानसिक दृष्ट्या अक्षम व्यक्ती' असेल तर, ती सज्ञान (वय १८ वर्षापेक्षा जास्त) झाल्यावर अ.पा.क. चे नाव कमी करण्यासाठी विशेष कार्यवाही करावी लागते.
[एखादी व्यक्ती 'दिव्यांग व्यक्तींचे अधिकार अधिनियम २०१६' अन्वये परिभाषित दिव्यांग व्यक्ती असल्यास त्या व्यक्तीला सदर अधिनियमाच्या कलम ५७ व ५८ अन्वये सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणपत्र प्रदान केलेले असते.]

मानसिक दृष्ट्या अक्षम व्यक्तीबाबतचा अ.पा.क. शेरा कमी करण्यासाठी प्रामुख्याने खालील दोन कायद्यांचा आधार घ्यावा लागतो.
**(१)** "दिव्यांग व्यक्तींचे अधिकार अधिनियम, २०१६" (Rights of Persons with Disabilities Act, 2016)
**(२)** "ऑटिझम, सेरेब्रल पाल्सी, मानसिक मंदता आणि एकाधिक अपंगत्व असलेल्या व्यक्तींच्या कल्याणासाठी राष्ट्रीय ट्रस्ट कायदा, १९९९" (National Trust for the Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act, 1999)

## "दिव्यांग व्यक्तींचे अधिकार अधिनियम, २०१६"

शारीरिक/मानसिक दृष्ट्या अक्षम व्यक्ती देखील भारताच्या मजबूत बांधणीसाठी महत्वाचे घटक आहेत या दृष्टीकोनातून भारत सरकारने "दिव्यांग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) कायदा" तयार केला होता जो दिनांक ७ फेब्रुवारी १९९६ रोजी अंमलात आला होता. त्यानंतर हा कायदा निरसीत करून, अधिक प्रभावी "दिव्यांग व्यक्तींचे अधिकार अधिनियम, २०१६" (Rights of Persons with Disabilities Act, 2016) हा कायदा दिनांक २८ डिसेंबर २०१६ रोजी राजपत्रात प्रसिध्द करून दिनांक १९.४.२०१७ रोजी अंमलात आला. या अधिनियमात दिव्यांगत्वाची व्याख्या गतिशील आणि व्यापक अर्थाने करण्यात आली तसेच दिव्यांग गटाच्या प्रकारांची संख्या ७ वरून २१ पर्यंत वाढविण्यात आली. त्यामुळे शारीरिक आणि मानसिक अशा दोन्ही दृष्ट्या अक्षम व्यक्तींचा समावेश "दिव्यांग" या व्याख्येत करण्यात आला.
['दिव्यांग व्यक्तींचे अधिकार अधिनियम २०१६', कलम १०२ अन्वये 'दिव्यांग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) कायदा, १९९५' निरसीत (repeal) केला गेला.]

या अधिनियमान्वये दिव्यांग व्यक्तीबाबत कोणतेही भेद, बहिष्कार, दिव्यांगत्वामुळे नोकरी, शिक्षण संदर्भात भेदभाव, इतरांच्या बरोबरीने ओळख, आनंद किंवा व्यायाम, राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्य किंवा इतर कोणत्याही क्षेत्रात भेदभाव करणे आणि वाजवी मत नाकारणे या गोष्टींना प्रतिबंध करण्यात आला.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

➲ या अधिनियमाच्या कलम २, खंड झेडसी अन्वये असलेल्या परिशिष्ठामध्ये दिव्यांगत्वात खालील बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

**ए. शारीरिक दिव्यांगत्व:**

**१. लोकोमोटर दिव्यांगता** (Locomotor disability) म्हणजे स्नायू व हाडांच्या किंवा चेतासंस्थेच्या (musculoskeletal or nervous system) किंवा दोन्हींच्या त्रासामुळे स्वतःच्या शरीराच्या आणि वस्तूंच्या हालचाली करता न येणे), यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो—

**(अ)** "कुष्ठरोगातून बरी झालेली व्यक्ती" म्हणजे ज्या व्यक्तीचा कुष्ठरोग बरा झाला आहे परंतु तिला खालील त्रास आहेत —

(i) हातापायांना तसेच डोळ्यांना व पापण्यांना संवेदना नसणे आणि पक्षाघात होणे, परंतु कोणतीही उघड विरुपता नसणे;

(ii) उघड विरुपता आणि पक्षाघात असणे परंतु तरीही सामान्य आर्थिक हालचाली करण्यासाठी आवश्यक असलेल्या हातापायांच्या हालचाली करता येणे;

(iii) टोकाची शारीरिक विरुपता तसेच वाढलेले वय ज्यामुळे कोणताही फायदेशीर व्यवसाय करता न येणे आणि त्यानुसार "कुष्ठरोगातून बरे झालेले" या अभिव्यक्तीचा अन्वयार्थ लावला जाईल;

**(ब)** "सेरेब्रल पाल्सी" (cerebral palsy) म्हणजे, मेंदूच्या एका किंवा विशिष्ट भागांना, सहसा जन्माच्या वेळी किंवा नंतर लगेचच, इजा झाल्यामुळे शरीराच्या हालचाली आणि स्नायूंमध्ये समन्वय साधण्यावर परिणाम करणारा, वाढत न जाणारा चेतासंस्थेच्या स्थितीचा समूह.

**(क)** "बुटकेपणा" (dwarfism) म्हणजे एक अशी वैद्यकीय किंवा जनुकीय स्थिती ज्यामध्ये प्रौढ व्यक्तीची उंची ४ फूट १० इंच (१४७ सेंटिमीटर) किंवा त्याहून कमी असते;

**(ड)** "मस्क्युलर डिस्ट्रॉफी (muscular dystrophy-स्नायूंमध्ये दोष)" म्हणजे अनुवंशिक जनुकीय स्नायू विकारांचा समूह ज्यामुळे मानवी शरीराच्या हालचालीसाठी आवश्यक असलेले स्नायू कमकुवत होतात. असे अनेक दोष असलेल्या व्यक्तींच्या जनुकांबाबत माहिती चुकीची आणि गहाळ झालेली असते, ज्यामुळे निरोगी स्नायूंसाठी आवश्यक असलेली प्रथिने त्यांच्या शरीरात तयार होत नाहीत. हाडे व स्नायूचा कमकुवतपणा वाढत जाणे, स्नायूंच्या प्रथिनांमध्ये दोष आणि स्नायूंच्या पेशी व उती मृत होणे ही याची वैशिष्ट्ये आहेत;

**(इ)** "ॲसिड हल्ल्याचे पिडीत" (acid attack victims) म्हणजे ॲसिड किंवा तत्सम क्षरणकारी पदार्थ फेकून हिंसक हल्ला झाल्यामुळे विद्रुप झालेली व्यक्ती.

**२. दृष्टी दोष**—

**(अ)** "अंधत्व" (blindness) म्हणजे पूर्ण उपचार केल्यानंतरही एखाद्या व्यक्तीची खालीलपैकी कोणतीही स्थिती असणे—

(i) अजिबात न दिसणे; किंवा

(ii) सर्व संभाव्य उपचार केल्यानंतरही चांगल्या डोळयामध्ये, ३/६० पेक्षा कमी किंवा १०/२०० (स्नेलेन) पेक्षा कमी दृश्यमान सूक्ष्मता (व्हिज्युअल ॲक्युईटी); किंवा

(iii) १० अंशांहून कमी कोनातील दृष्टीच्या क्षेत्राची मर्यादा.

**(ब)** "कमी दिसणे" (low-vision) म्हणजे अशी स्थिती ज्यामध्ये एखाद्या व्यक्तीची खालीलपैकी कोणती स्थिती असते:—

(i) सर्व संभाव्य दुरुस्ती केल्यानंतरही चांगल्या डोळयामध्ये, ६/१८ च्या पुढे न जाणारी किंवा २०/६० पेक्षा कमी ३/६० पर्यंत किंवा १०/२०० (स्नेलेन) पर्यंत कमी दृश्यमान सूक्ष्मता (visual acuity); किंवा

(ii) ४० अंशांहून कमी किंवा १० अंशापर्यंत कोनातील दृष्टीच्या क्षेत्राची मर्यादा.

**३. श्रवण दोष**—

**(अ)** "बहिरा" (deaf) म्हणजे बोलण्याच्या वारंवारितेसाठी दोन्ही कानांना ७०डीबी श्रवण बाधा झालेल्या व्यक्ती;

**(ब)** "अंशतः बधीर" (hard of hearing) म्हणजे बोलण्याच्या वारंवारितांमध्ये दोन्ही कानांना ६० ते ७० डीबी श्रवण बाधा झालेल्या व्यक्ती;

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

**४. वाचा आणि भाषा अक्षमता** (speech and language disability) म्हणजे लॅरिन्जेक्टॉमी (स्वरयंत्र काढून टाकणे) किंवा अफशिया (वाचा शक्ती नष्ट होणे) यांसारख्या जैविक किंवा चेतासंस्थेच्या स्थितींमुळे वाचा व भाषेच्या एक किंवा अधिक घटकांवर परिणाम होऊन निर्माण झालेली कायमस्वरूपी दिव्यांगता.

**५. बौद्धिक अक्षमता** (Intellectual disability) म्हणजे एक अशी स्थिती ज्यामध्ये बौद्धिक कार्यात्मकता (तर्क करणे, शिकणे, समस्या सोडवणे) आणि अनुकूल वर्तन या दोन्हींवर ठळक मर्यादा येते ज्यामध्ये अनेक दैनंदिन, सामाजिक आणि व्यावहारिक कौशल्ये असतात, यामध्ये समावेश होतो—

**(अ)** "विशिष्ट शैक्षणिक अक्षमता" (specific learning disabilities) म्हणजे स्थितींचा एक विषम समूह ज्यामध्ये बोललेल्या किंवा लिखित भाषेवर प्रक्रिया करण्यात त्रुटी असते, जे समजून घेणे, बोलणे, वाचणे, लिहिणे, शब्दलेखन करणे किंवा गणितीय गणना करण्यातील अडचणीतून व्यक्त होते आणि यामध्ये संकल्पनात्मक अक्षमता, वाचन अक्षमता (डिस्लेक्सिया), लेखनदोष (डिसग्राफिया), आकडेमोड करता न येणे (डिसकॅल्क्युलिया), असूत्रता दोष (डिस्प्रॅक्सिया) आणि विकासात्मक वाचाघात (अफॅसिया) यांसारख्या स्थितींचा समावेश होतो;

**(ब)** "ऑटिझम स्पेक्ट्रम विकार" (autism spectrum disorder) म्हणजे एक अशी चेता-विकास स्थिती जी सहसा वयाच्या पहिल्या तीन वर्षांमध्येच दिसून येते. याचा व्यक्तीच्या इतरांशी संवाद साधणे, नाती समजावून घेणे आणि इतरांशी संबंध जोडणे यावर परिणाम होतो आणि अनेकदा असामान्य किंवा साचेबंद क्रिया किंवा वर्तनाशी संबंधित असते.

**६. मानसिक वर्तन**,— "मानसिक आजार" (mental illness) म्हणजे विचार करणे, मनःस्थिती, दृष्टीकोन, अभिमुखता किंवा स्मरणशक्तीतील बिघाड ज्यामुळे अंदाज बांधणे, वर्तणूक, वास्तविकता ओळखण्याची क्षमता किंवा जीवनातील सामान्य मागण्या पूर्ण करण्याची क्षमता कमी होते, परंतु यामध्ये मंदन समाविष्ट होत नाही जी व्यक्तीच्या खुंटलेल्या किंवा अपूर्ण मानसिक विकासाची स्थिती असून याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे बुद्धिमत्तेचा विकास खुंटणे हे आहे.

**बी.** पुढील गोष्टींमुळे येणारे अपंगत्व -

**(अ)** चेतासंस्थेच्या दिर्घकालीन अवस्था, (chronic neurological conditions) जसे की—

(i) "मल्टिपल स्क्लेरोसिस" (multiple sclerosis) म्हणजे एक दाहक, चेतासंस्थेचा विकार ज्यामध्ये मेंदू आणि मेरूदंडाभोवतीच्या चेतापेशीच्या तंतूंचे संरक्षण करणाऱ्या मायलेन शीथला नुकसान पोहोचून डेमिलेनेशन होते व मेंदू आणि मेरूदंडातील चेतापेशींच्या परस्परांशी संवाद साधण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो;

(ii) "पार्किन्सनचा आजार" (Parkinson's disease) म्हणजे चेतासंस्थेचा एक वाढत जाणारा आजार ज्याची लक्षणे म्हणजे कंप, स्नायू कडकपणा आणि संथ, अस्थिर हालचाल ही असतात. प्रामुख्याने मध्यम वयाच्या आणि वृद्ध लोकांवर याचा परिणाम होतो. मेंदूच्या तळाशी असलेल्या गंडिकेचा ऱ्हास (बेसल गॅन्ग्लियाचा ऱ्हास) आणि चेतापारेषक (न्युरोट्रान्समीटर) डोपामाईनच्या कमतरतेमुळे ही स्थिती निर्माण होते.

**(७) रक्त विकार**—

(i) "हिमोफिलिया" (hemophilia) म्हणजे एक अनुवंशिक आजार, हा सहसा केवळ पुरुषांनाच होतो, परंतु स्त्रियांद्वारे त्यांच्या मुलग्यांना होऊ शकतो. यामध्ये रक्ताची गुठळी होण्याची क्षमता गमावली जाते किंवा बाधीत होते त्यामुळे किरकोळ जखमेतूनही प्राणघातक रक्तस्त्राव होऊ शकतो;

(ii) "थॅलेसेमिया" (thalassemia) म्हणजे अनुवंशिक विकारांचा एक समूह ज्यामध्ये हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी असते किंवा अजिबात नसते.

(iii) "सिकल सेल डिसीज" (sickle cell disease) म्हणजे एक हिमोलायटिक (hemolytic) विकार ज्यामध्ये संबंधित उती (tissue) आणि इंद्रियांना (organ) नुकसान पोहोचल्याने जुनाट रक्ताल्पता (ॲनिमिया), वेदनादायक घटना आणि विविध गुंतागुंती निर्माण होतात; "हिमोलायटिक" म्हणजे लाल रक्तपेशींच्या अस्तराचा ऱ्हास होऊन हिमोग्लोबिन मुक्त होणे.

**सी.** एकाधिक दिव्यांगता (Multiple Disabilities) वर निर्दिष्ट दिव्यांगतांपैकी एकापेक्षा जास्त दिव्यांगता असणे. यामध्ये व्यक्तीला श्रवण आणि दृष्टी बाधा दोन्ही असते त्यामुळे तीव्र संवाद, विकास आणि शैक्षणिक समस्या उद्भवतात.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

**डी.** केंद्र शासनाने सूचित केलेली इतर कोणतीही श्रेणी.

▶ या अधिनियमातील व्याख्यांनुसार,

➲ "बेंचमार्क अक्षमता असलेल्या व्यक्ती" (person with benchmark disability) चा अर्थ, चाळीस टक्क्यांहून जास्त दिव्यांगता असलेल्या व्यक्ती असा होतो.

➲ "दिव्यांग व्यक्ती" म्हणजे दीर्घकालीन शारीरिक, मानसिक, बौद्धिक किंवा संवेदनाक्षम असणारी व्यक्ती असा होतो.

➲ "उच्च समर्थन आवश्यकता असलेल्या अक्षम व्यक्ती " (person with disability having high support needs) म्हणजे, कोणत्याही दिव्यांगांपैकी कमीतकमी ४०% दिव्यांगत्व असलेली व्यक्ती, ज्याला आधाराची आवश्यकता आहे आणि ज्याने सदर अधिनियमाच्या कलम ५८ (२)(अ) अन्वये विहित अधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र धारण केले आहे.

➲ या अधिनियमाच्या कलम ७(२) अन्वये, दिव्यांग व्यक्तीबरोबर गैरवर्तन, हिंसा किंवा शोषण केले गेले आहे, किंवा केले जात आहे किंवा ते केले जाऊ शकते याबाबत कोणतीही व्यक्ती किंवा नोंदणीकृत संस्था, स्थानिक अधिकारिता असणाऱ्या 'कार्यकारी दंडाधिकारी' यांना माहिती देऊ शकेल.
अशी माहिती प्राप्त होताच, संबंधित कार्यकारी दंडाधिकारी, सदर घटनेला प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने आणि दिव्यांग व्यक्तीच्या संरक्षणासाठी तात्काळ कारवाई करेल. त्यात खालील बाबींचा समावेश असू शकेल:-
(अ) पोलीस किंवा दिव्यांग व्यक्तींच्या सुरक्षेचे किंवा पुनर्वसनासाठी काम करणाऱ्या संस्थेस किंवा दोघांना, अशा पिडीत दिव्यांग व्यक्तीस सोडवून आण्यासाठी आदेशीत करू शकेल.
(ब) दिव्यांग व्यक्तीची ईच्छा असल्यास, त्याला सुरक्षात्मक संरक्षण प्रदान करू शकेल.
(क) दिव्यांग व्यक्तीच्या देखरेखीची (provide maintenance) व्यवस्था करू शकेल.

➲ या अधिनियमाच्या कलम ३१ (१) अन्वये, मुलांचा विनामूल्य आणि अनिवार्य शिक्षण हक्क कायदा, २००९ (Rights of Children to Free and Compulsory Education Act, 2009) मध्ये काहीही नमूद असले तरी, बेंचमार्क अक्षमता असलेल्या, सहा ते अठरा वयोगटातील प्रत्येक मुलाला, त्याच्या वयाची अठरा वर्षे पूर्ण होईपर्यंत त्याच्यासाठी योग्य वातावरण असलेल्या एखाद्या परिचित आणि आवडीच्या शाळेत विनामूल्य शिक्षणाचा अधिकार असेल.

➲ या अधिनियमाच्या कलम ३२ (१) अन्वये, शासनाकडून मदत मिळवणाऱ्या उच्च शिक्षण आणि इतर उच्च शिक्षण सरकारी संस्था, बेंचमार्क अक्षमता असलेल्या व्यक्तींसाठी पाच टक्क्यांहून कमी नसतील इतक्या जागा आरक्षीत ठेवतील तसेच त्यांना उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्रवेशासाठी वयात पाच वर्ष उच्च वयाची सवलत दिली जाईल.

➲ या अधिनियमाच्या कलम ८९ अन्वये, जी व्यक्ती या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा कोणत्याही नियमाचे उल्लंघन करेल ती, प्रथम उल्लंघनासाठी रूपये दहा हजार पर्यंतच्या दंडासाठी पात्र ठरेल आणि त्यानंतरच्या कोणत्याही भंगासाठी  रूपये पन्नास हजार ते रुपये पाच लाख पेक्षा कमी नाही इतक्या दंडासाठी पात्र ठरेल.

➲ या अधिनियमाच्या कलम ९१ अन्वये, जी व्यक्ती बेंचमार्क अक्षमता असलेल्या व्यक्तींसाठी असलेल्या सवलतींचा फायदा फसवणुक करून मिळवेल किंवा मिळविण्याचा प्रयत्न करेल ती व्यक्ती  दोन वर्षापर्यंत कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक लाख रुपयापर्यंतच्या दंडास किंवा दोन्ही शिक्षांसाठी पात्र ठरेल.



Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

➲ या अधिनियमाच्या कलम ९२ अन्वये, जो कोणी-
(अ) एखाद्या सार्वजनिक ठिकाणी, जाणूनबुजून, एखाद्या दिव्यांग व्यक्तीला अपमानीत करेल किंवा भयभीत करेल;
(ब) एखाद्या दिव्यांग व्यक्तीला अपमानीत करण्यासाठी त्यावर हल्ला करेल किंवा बळाचा वापर करेल किंवा एखाद्या दिव्यांग स्त्रीबरोबर असभ्य वर्तन करेल;
(क) एखाद्या दिव्यांग व्यक्तीच्या अंगावर जाऊन त्यावर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करेल किंवा अशा दिव्यांग व्यक्तीला जाणूनबुजून अन्न किंवा पाणी देण्याचे नाकारेल;
(ड) दिव्यांग मुलाच्या किंवा स्त्रीच्या इच्छेवर वर्चस्व मिळविण्यासाठी त्यांचे लैंगिक शोषण करेल;
(ई) कोणत्याही दिव्यांग व्यक्तीला स्वेच्छेने हानी पोहोचवेल, नुकसान करेल किंवा त्याच्या विरूध्द कोणतेही सहायक उपकरण वापरेल;
(फ) अशा कोणत्याही वैद्यकीय प्रक्रियेचे आयोजन किंवा निर्देशन करेल ज्यामुळे एखाद्या दिव्यांग स्त्रीचा गर्भपात होईल किंवा तशी शक्यता निर्माण होईल; *(गंभीर प्रकरणांमध्ये नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी आणि दिव्यांग स्त्रीच्या पालकांच्या संमतीने गर्भपात केला जाऊ शकतो)* अशा व्यक्तीस सहा महिने ते पाच वर्षांपर्यंत कारावासाची आणि दंडाची शिक्षा होऊ शकेल.

**"ऑटिझम, सेरेब्रल पाल्सी, मानसिक मंदता आणि एकाधिक अपंगत्व असलेल्या व्यक्तींच्या कल्याणासाठी राष्ट्रीय ट्रस्ट कायदा, १९९९"**

**(अ)** "ऑटिझम" (autism) म्हणजे आत्ममग्नता किंवा स्वमग्नता. हा एक गुंतागुंतीचा आजार असून बऱ्याच मुलांना हा आजार 'जन्मजात' असतो. ऑटिस्टिक मुले साधारण मुलांसारखी दिसतात. मतिमंद दिसत नाहीत मात्र अचानक एकदम विचित्र क्रिया करायला लागतात.
**(ब)** "सेरेब्रल पाल्सी" (cerebral palsy) म्हणजे, मेंदूच्या एका किंवा विशिष्ट भागांना, सहसा जन्माच्या वेळी किंवा नंतर लगेचच, इजा झाल्यामुळे शरीराच्या हालचाली आणि स्नायूंमध्ये समन्वय साधण्यावर परिणाम करणारा, वाढत न जाणारा चेतासंस्थेच्या स्थितीचा समूह.
**(क)** मानसिक मंदता (Mental retardation) हा एक मानसिक आजार आहे ज्यात व्यक्तीची संज्ञानात्मक कार्यप्रणाली मोठ्या प्रमाणावर कमी होते आणि दोन किंवा जास्त अनुकूल वर्तनांमध्ये (adaptive behaviors) कमतरता होते. मानसिक मंदता ही विकासाशी संबंधित मानसिक स्थिती आहे.
**(ड)** एकाधिक दिव्यांगता (Multiple Disabilities) म्हणजे एकापेक्षा जास्त दिव्यांगता असणे. यामध्ये व्यक्तीला श्रवण आणि दृष्टी बाधा दोन्ही असते त्यामुळे तीव्र संवाद, विकास आणि शैक्षणिक समस्या उद्भवतात.

उपरोक्त कायद्याच्या कलम १३ अन्वये एक स्थानिक पातळी समितीची स्थापना केली जाते.
स्थानिक पातळीवरील समितीमध्ये खालील सदस्य असतात.-
(अ) केंद्र किंवा राज्य शासनाच्या नागरी सेवेमधील 'जिल्हा दंडाधिकारी' दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला अधिकारी
(बी) दिव्यांग व्यक्तींच्या सुरक्षेचे किंवा पुनर्वसनासाठी काम करणाऱ्या नोंदणीकृत संस्थेचे प्रतिनिधी; आणि
(सी) 'दिव्यांग व्यक्तींचे अधिकार अधिनियम २०१६' अन्वये परिभाषित दिव्यांग व्यक्ती.
या स्थानिक पातळी समितीची बैठक प्रत्येक तीन महिन्यांत कमीतकमी एकदा किंवा आवश्यकतेनुसार आयोजित करण्यात येईल.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

उपरोक्त कायद्याच्या कलम १४ अन्वये पालकाची (guardian) नियुक्ती करण्याची तरतुद आहे.
यासाठी दिव्यांग व्यक्तीच्या आई किंवा वडीलांनी किंवा पालकांनी किंवा तिच्या नातेवाईकाने किंवा दिव्यांग व्यक्तींच्या सुरक्षेचे किंवा पुनर्वसनासाठी काम करणाऱ्या नोंदणीकृत संस्थेने स्थानिक पातळीवरील समितीकडे 'दिव्यांग व्यक्तीचा पालक' (guardian of the persons with disability) म्हणून नियुक्तीसाठी "ऑटिझम, सेरेब्रल पाल्सी, मानसिक मंदता आणि एकाधिक अपंगत्व असलेल्या व्यक्तींच्या कल्याणासाठी राष्ट्रीय ट्रस्ट नियम, २०००, नियम १६(१) अन्वये फॉर्म-ए मध्ये अर्ज करावा लागतो.

असा अर्ज प्राप्त झाल्यावर स्थानिक पातळीवरील समिती, दिव्यांग व्यक्तीला पालक असणे गरजेचे आहे काय आणि अशा पालकत्वाचा हेतू काय याबाबत विचारविनियम करते. नियमानुसार इतर कार्यवाही झाल्यानंतर फॉर्म-बी नमुन्यामध्ये पालकाला नियुक्तीचे पत्र दिले जाते. पालक म्हणून नियुक्ती झाल्यावर अशा पालकावर संबंधित दिव्यांग व्यक्तीची आणि त्याच्या मालमत्तेची काळजी घेण्याची जबाबदारी असते.
पालक म्हणून नियुक्ती झाल्यावर अशा पालकाने सहा महिन्याच्या आत, नियम २७(१) अन्वये फॉर्म-सी मध्ये दिव्यांग व्यक्तीच्या मालमत्तेबाबतचे विवरणपत्र सादर करावे लागते तसेच प्रत्येक आर्थिक वर्षाच्या समाप्तीच्या तीन महिन्यांच्या आत नियम २७(२) अन्वये फॉर्म-डी मध्ये दिव्यांग व्यक्तीच्या मालमत्तेचे हिशोब (account of the property and assets) सादर करावा लागतो.

जर असा नियुक्त केलेला पालक दिव्यांग व्यक्तीचा गैरवापर करीत आहे किंवा दिव्यांग व्यक्तीकडे दुर्लक्ष करीत आहे किंवा दिव्यांग व्यक्तीच्या मालमत्तेचा गैरवापर करीत आहे असे आढळून येईल तेव्हा उपरोक्त कायद्याच्या कलम १७ अन्वये, अशा पालकाची नियुक्ती रद्द करण्याचा अधिकार समितीला असतो.

मानसिक दृष्ट्या अक्षम व्यक्तीबाबतचा अ.पा.क. शेरा कमी करतांना, अशी व्यक्ती 'दिव्यांग व्यक्तींचे अधिकार अधिनियम २०१६' अन्वये परिभाषित दिव्यांग व्यक्ती असेल तर "ऑटिझम, सेरेब्रल पाल्सी, मानसिक मंदता आणि एकाधिक अपंगत्व असलेल्या व्यक्तींच्या कल्याणासाठी राष्ट्रीय ट्रस्ट कायदा १९९९, कलम १४ अन्वये, फॉर्म-बी नमुन्यामध्ये नियुक्त केलेल्या पालकाचे (guardian) नाव मानसिक दृष्ट्या अक्षम व्यक्तीबाबतच्या मिळकतीत, तसे स्पष्टपणे नमूद करून, मानसिक दृष्ट्या अक्षम व्यक्तीच्या नावाबरोबर दाखल करावे लागेल.

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector